**सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक ०३ याची जबानी**

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,
नांव - दिपक सुरेश कपले.
वय - ३८ वर्ष, व्यवसाय- किराणा दुकान,
राहणार – गांधी नगर, मलकापुर, तालुका - मलकापुर, जिल्हा- बुलढाणा.

**सरतपास- सरकारी अभियोक्ता श्रीमती आर.बी.देवराज यांचेमार्फत शपथेवर सुरु...**

०१. घटना दिनांक २१/१२/२०२१ रोजी मलकापुर-भालेगाव रस्त्यावर दुपारच्या वेळेस घडली होती. त्यावेळी पिवळ्या रंगाच्या अप्पे ऑटोमध्ये एक गाय व दोन गोरे आम्हाला दिसले होते. त्यावेळी माझा मित्र रितेश दहिभाते माझे सोबत होता. सदर पिवळ्या रंगाच्या ऑटोमध्ये इंगळे नावाचा व्यक्ती होता. मी त्याला ऑटो कुणाचा आहे, गायी कुणाच्या आहे, असे विचारले असता ऑटो अक्रमशहाचा असुन गायी त्याच्या असल्याचे त्याने सांगितले. आम्हाला सदर व्यक्तीने दिलेली माहिती उडवाउडवीची वाटल्यामुळे आम्ही सदर घटनेची माहिती पोलीसांना दिली. त्यावरून पोलीस तेथे आले. त्यानंतर आम्ही पोलीसांसोबत एक गाय व दोन गोरे गौरक्षण मध्ये पाठवुन दिले. आज न्यायालयात अक्रमशहा नावाचा व्यक्ती हजर आहे. परंतु, इंगळे नावाचा व्यक्ती हजर नाही.

**सरतपासणी पुर्ण.**

**उलटतपास- आरोपींतर्फे विधीज्ञ श्री.आर.एम.निकम यांचे मार्फत सुरू.**

०२. हे म्हणणे खरे आहे की, मी व रितेश दहिभाते बजरंग दल संघटनेचे सक्रिय कार्यकर्ते आहोत, गायी व गोरे असलेल्या ब-याच गाड्या आम्ही पकडलेल्या आहे. मी माझे किराणा दुकानामध्ये सकाळी व दुपारी अंदाजे दोन ते चार तास बसतो. मला किराणा दुकानामध्ये माझे वडील मदत करतात.

०३. हे म्हणणे खरे आहे की, गांधी नगर मलकापुर पासुन मलकापुर-भालेगाव

रस्ता बराच दुर आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनेचे वेळी मी माझे किराणा दुकानामध्ये होतो. मी पोलीसांना बयाण देते वेळी एक गाय व दोन गोरे गौरक्षण मध्ये पाठविल्याचे सांगितले नव्हते. घटनेचे दिवशी पोलीसांनी माझे बयाण पोलीस स्टेशनमध्ये घेतले होते. हे मला आज निश्चीत आठवत नाही की, घटनेनंतर दोन दिवसांनी पोलीसांनी माझे बयाण घेतले होते किंवा कसे.

०४. हे म्हणणे खरे नाही की, पिवळ्या रंगाच्या ॲप्पे ऑटोमध्ये एक गाय व दोन गोरे नव्हते, त्यांचेशी आरोपींचा संबंध नाही, मी आज न्यायालयात खोटी साक्ष दिली.

**उलट-तपासणी पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by SUNIL SAKHARAM MAHALE
Date: 2026.01.03 17:40:29 +0530

**दिनांक : ०३.०२.२०२६**

**(सुनिल स. महाले)**
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
मलकापूर.